PRC/PR/08/2026

# Global KPMG Infrastructure Leadership Engages with MMRDA to Strengthen World-Class Contract Management Frameworks

**Mumbai | 26th February 2026**

In a high-level global engagement reflecting MMRDA's rising international stature, senior leadership from KPMG International called on Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA), to deliberate on the adoption of advanced global standards in contract management and infrastructure governance. The delegation was led by Ms. Lisa Kelvey, Global Head – Infrastructure and Transport, KPMG International, accompanied by Mr. Suneel Vora, Partner and Head – Major Projects Advisory, KPMG India.

The meeting focused on institutionalizing globally benchmarked frameworks for contract structuring, risk allocation, procurement reform, performance monitoring, and dispute avoidance mechanisms for large-scale infrastructure projects in the Mumbai Metropolitan Region. Drawing upon KPMG's experience across complex transport and infrastructure programs in advanced economies, the discussions emphasized practical strategies to decisively reduce cost overruns, minimize time delays, enhance fiscal discipline, and strengthen execution efficiency through digital oversight systems and governance controls.

Dr. Mukherjee highlighted MMRDA's commitment to embedding international best practices within its project lifecycle management systems, ensuring stronger procurement competitiveness, improved contract oversight, and timely delivery of transformative regional infrastructure.

The engagement marks a significant step in aligning MMRDA's project governance architecture with global standards, reinforcing its position as a forward-looking metropolitan authority committed to efficiency, transparency, and world-class infrastructure delivery.

---

# जागतिक केपीएमजी पायाभूत सुविधा नेतृत्वाची एमएमआरडीए सोबत बैठक : जागतिक दर्जाच्या करार व्यवस्थापन आराखड्यांना बळकट करण्यासाठी उच्चस्तरीय संवाद

**मुंबई | दि. २६ फेब्रुवारी २०२६**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचे प्रतीक म्हणून आंतरराष्ट्रीय केपीएमजीच्या वरिष्ठ नेतृत्वाने महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी,

भा.प्र.से. यांची भेट घेऊन करार व्यवस्थापन व पायाभूत सुविधा प्रशासन क्षेत्रात प्रगत जागतिक मानके अवलंबण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व सुश्री लिसा केल्वी, ग्लोबल हेड - इन्फ्रास्ट्रक्चर अँड ट्रान्सपोर्ट, केपीएमजी इंटरनॅशनल यांनी केले. त्यांच्यासोबत श्री. सुनील वोरा, भागीदार व प्रमुख - मेजर प्रोजेक्ट्स ॲडव्हायजरी, केपीएमजी इंडिया उपस्थित होते.

या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशातील मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी करार संरचना, जोखीम वाटप, खरेदी प्रक्रियेतील सुधारणा, कार्यप्रदर्शन निरीक्षण तसेच वाद टाळण्याच्या यंत्रणा यांसाठी जागतिक मानकांनुसार चौकट संस्थात्मक करण्यावर भर देण्यात आला. प्रगत अर्थव्यवस्थांमधील गुंतागुंतीच्या परिवहन व पायाभूत सुविधा कार्यक्रमांतील केपीएमजीच्या अनुभवाच्या आधारे खर्चवाढ निर्णायकरीत्या कमी करणे, कालबद्धता सुनिश्चित करणे, आर्थिक शिस्त बळकट करणे तसेच डिजिटल देखरेख प्रणाली व प्रशासनिक नियंत्रणांद्वारे कार्यान्वयन कार्यक्षमता वाढविण्यासंदर्भात व्यवहार्य उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी एमएमआरडीएकडून प्रोजेक्ट लाइफसायकल मॅनेजमेंट सिस्टम आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती समाविष्ट करण्याबाबतची बांधिलकी अधोरेखित केली. यामुळे खरेदी प्रक्रियेतील स्पर्धा वाढविणे, करार देखरेख अधिक प्रभावी करणे तसेच परिवर्तनात्मक प्रादेशिक पायाभूत सुविधा प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी सुनिश्चित करणे शक्य होणार आहे.

सदर बैठक ही एमएमआरडीएच्या प्रकल्प प्रशासन संरचनेचे जागतिक मानकांशी संरेखन करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, कार्यक्षमता, पारदर्शकता आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात प्राधिकरणाची कटिबद्धता व दूरदृष्टी अधोरेखित करते.

---

